# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड   जा.क्र. 253 / 2023   दिनांक : 30.06.2023**

## नांदेड पोलीस दलातील सत्तावीस, पोलीस अधिकारी व अंमलदार सेवानिवृत्त...

नांदेड पोलीस दलातील सत्तावीस पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार नियत वयोमानानुसार दिनांक 30.06.2023 रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यामध्ये एक पोउपअ, तीन पोउपनि, आठ श्रेणी पोउपनि आणि पंधरा पोलीस अंमलदार आहेत. **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली **मा. श्रीमती डॉ. अश्विनी जगताप**, पोउपअ(मु) नांदेड, यांचे हस्ते सर्व सेवानिवृत्तांचा पुष्पगुच्छ, शाल श्रीफळ व भेट वस्तु देवुन सत्कार करण्यात आला. सदर सेवानिवृत्त समारंभ मंथन हॉल पोलीस अधिक्षक कार्यालया मध्ये पार पडला. सर्व सेवानिवृतांनी आता आपल्या कुटूंबाकडे लक्ष पुरेसा वेळ देण्याचा सल्ला दिला. सदर सेवानिवृत्त समारंभास. **मा. श्री ऐलाने**, पोनि नियत्रंण कक्ष **मा. श्री टाक**, पोनि जिवीशा **मा. श्री नामदेव रिठ्ठे**, पोनि पोलीस कल्याण **श्री शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी नांदेड, **मपोउपनि श्रीमती माया भोसले**, पोलीस कल्याण विभाग नांदेड, व ईतर शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार कर्मचारी मोठया संख्येने हजर होते. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन **सपोउपनि विठ्ठल कत्ते**, यांनी केले असुन, मपोकॉ **राखी कसबे**, पोलीस कल्याण, यांनी कार्यक्रमाचे उत्तम प्रकारे आयोजन केले.

| अ.क्र. | हुद्दा | सेविनिवृत्त अंमलदाराचे नाव | नेमणुक |
|---|---|---|---|
| 01 | पेउपअधि | विजय नागोराव डोंगरे | डप–विभाग किनवट |
| 02 | पोउपनि | कल्याण किशनराव मांगुळकर | पोस्टे अर्धापुर |
| 03 | पोउपनि | लतीफ रहिम अब्दुल | पोस्टे रामतिर्थ |
| 04 | पोउपनि | ताहेरअली जब्बारखान पठाण | पो. नियंत्रण कक्ष |
| 05 | ग्रेडपोउपनि | मधुकर संभाजी नागरगोजे | पोलीस मुख्यालय |
| 06 | ग्रेडपोउपनि | अशोक माणिकराव इंगोले | पोस्टे रामतिर्थ |
| 07 | ग्रेडपोउपनि | दत्तात्रय किशनराव कदम | पोलीस मुख्यालय |
| 08 | ग्रेडपोउपनि | जनार्धन कालाप्पा बोधने | पोस्टे बिलोली |
| 09 | ग्रेडपोउपनि | व्यंकट लक्ष्मण झेलेवाड | पोस्टे बिलोली |
| 10 | ग्रेडपोउपनि | रावसाहेब दिगांबर पवार | एसीबी नांदेड |
| 11 | ग्रेडपोउपनि | विलास माधवराव शिंगे | पोस्टे वजिराबाद |
| 12 | ग्रेडपोउपनि | आनंदा प्रभाकर जोंधळे, | पोस्टे इतवारा |
| 13 | सपोउपनि | नरसिमलु हनमनलू गटूवार | पोस्टे धर्माबाद |
| 14 | सपोउपनि | गौस अब्दुलनबी शेख | पोस्टे मुदखेड |
| 15 | सपोउपनि | बुऱ्हानखान हुसैनखान पठाण | पोस्टे भाग्यनगर |
| 16 | सपोउपनि | गोविंद जळबा टेंभुर्णे | पोस्टे मुखेड |
| 17 | सपोउपनि | विष्णु केरबा शिंदे | पोस्टे शिवाजीनगर |
| 18 | सपोउपनि | गौतम शेषेराव कांबळे | पोस्टे इतवारा |
| 19 | पोहेकॉ /623 | खुशाल पुंडलकराव सदाभिजे | पोलीस मुख्यालय |
| 20 | पोहेकॉ /738 | परशुराम विश्वनाथ मोरे | पोस्टे शिवाजीनगर |
| 21 | पोहेकॉ /1232 | सुरेश चंपतराव सोनाळे | पोस्टे धर्माबाद |
| 22 | पोहेकॉ /1507 | न्दंकुमार सुदर्शन डहाळे | पोलीस मुख्यालय |
| 23 | पोहेकॉ /1927 | अशोक बाबुराव भुत्ते | पोस्टे सोनखेड |
| 24 | पोहेकॉ /2210 | दुर्गाजी निवृती पाटील | पोस्टे माळाकोळी |
| 25 | पोहेकॉ /2335 | गोविंद गंगाराम चंदनफुले | पोस्टे मुखेड |
| 26 | पोहेकॉ /2814 | माधवराव किशनराव फड | पोस्टे किनवट |
| 27 | पोहेकॉ /422 | संजय मल्हारराव जोंधळे | पोलीस मुख्यालय |

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड







# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 254 / 2023 दिनांक : 30.06.2023**

## 1)जबरी चोरी आणि खंडणी :–

**शिवाजीनगर :–**दिनांक 28.06.2023 रोजी चे रात्री 21.30 ते 22.00 ते दिनांक 29.06.2023 चे दुपारी 13.30 ते 14.30 वा. चे दरम्यान, **बाबानगर सार्वजनिक रोडवर नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांचे मित्र हे दिनांक 28.06.2023 रोजी रात्री 09.30 वा. ते 10. 00 वा. चे दरम्यान पायी जात असतांना फिर्यादी यांचे तोंड ओळख असलेला इसम नामे लाईक व त्याचे सोबत इतर दोघे साथीदार असे तिघांनी त्यांना बाबानगर येथे अडवुन खंजरचा धाक दाखवुन व काठीने मारहाण करून जखमी मित्र अजय काळे यांचेकडील वन प्लस कंपणीचा मोबाईल किंमती 35,000/–रूपयाचा व आनंद व भालेराव यांचे खिशातील नगदी 2000/–रू असा एकुण 37,000/–रूपयाचा मुद्देमाल जबरीने चोरून घेवुन तुम्हाला हा वन प्लस कंपणीचा मोबाईल पाहिजे असल्यास, तु दसरे मुले देतात तसे पैसे मला 3000/–रूपये देवुन मोबाईल परत घे असे म्हणुन तिघांनी खंजरचा धाक दाखवुन व काठीने मारहाण करून जखमी करून पिस्टलने मारतो अशी धमकी देवुन खंडणीची मागणी केली. व दिनांक 29.06.2023 रोजी दुपारी 13.30. ते 14.00 वा. चे दरम्यान पुन्हा गाठुन परत पैसे मागुन खंजरचा धाक दाखवुन जिवे मारण्याची धमकी दिली आहे. वगैरे **फिर्यादी सिध्दांत ज्ञानेश्वर पवार, वय 19 वर्षे, व्यवसाय शिक्षण आरसीसी क्लासेस, टिळकनगर नांदेड रा. घडोली तांडा ता. जिंतुर जि. परभणी ह. मु. मयुर अपार्टमेंट डी, पंचशील समोर स्वीस बेकरीजवळ श्रीनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 202/2023 कलम 394, 384, 506, 34 भादवी सह कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री पुणे**, **मो.क्र. 9403188318** हे करीत आहेत.

## 2)प्राण्यास क्रुरतेने वागणुक :–

**1)भाग्यनगर :–**दिनांक 28.06.2023 रोजी चे 22.30 वा. चे सुमारास, **शेख अन्सार शेख जबार यांचे नसरतपुर शेत शिवारातील सर्वे नं 16 व सबा गार्डन पाटीजवळ भंगारच्या गोडाऊन मध्ये नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने त्यांचे नसरतपुर शेत शिवारातील गार्डन पाटीजवळ भंगारच्या गोडाऊन मध्ये एक लाल तांबडया रंगाचा गोरा किंमती 30,000/–रूपयाचा बैल अपुऱ्या जागेत निर्दयतेने बिना परवाना बेकायदेशिररीत्या कत्तल करण्या करीता बांधुन ठेवलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2348, विठ्ठल व्यकंटराव गदमवाड, ने. पोस्टे भाग्यनगर** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर गुरन 249/2023** कलम 5 (अ) 5 (ब), व 9, (3)11(ड)(ई)(फ) प्राण्यांना क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम व महाराष्ट्र प्राणि संरक्षण कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2150 माळवे, मो. नं. 9970376878** हे करीत आहेत.

**2)भोकर :–**दिनांक 29.06.2023 रोजी चे 10.00 वा. चे सुमारास, **भोकर ते नांदेड जाणारे बायपास रोडवर शेख गफार यांचे भंगार दुकानाचे पाठीमागे शेख बशीर शेख शादुल्ला रा. विश्वकर्मा नगर म्हैसा रोड, भारत गॅस गोडाऊन जवळ भोकर यांचे प्लॉटमध्ये खाजानगर भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून वरील ठिकाणी सलमान हबीब कुरेशी, वय 23 वर्षे, व्यवसाय खाटीक रा. खाजानगर भोकर यांने कतलीसाठी बंदी असलेल्या गोवंश जनावराचे कत्तल केली असुन त्याचे ताब्यातील अंदाजे 150 किलो वजनाचे प्रति किलो किंमती 150/–रूपया प्रमाणे असे एकुण 22,500/–रूपयाचे गोवंशाचे मास, हाडे मिळुन आली. तसेच कत्तलीसाठी ठेवलेली आठ गोवंश जातीचे जनावरे एकुण किमती 75,000/– त्यांचे नसरतपुर शेत शिवारातील गार्डन पाटीजवळ भंगारच्या गोडाऊन मध्ये एक लाल तांबडया रंगाचा गोरा किंमती 30,000/–रूपयाचे मिळुन आले. याकामी प्लॉट मालक शेख बशीर शेख शादुला याने त्यास स्वतःच्या जागेचा वापर करू देवुन गोवंश कत्तल करण्यास मदत केली. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री राम नामदेवराव कराड, ने. पोस्टे भोकर** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे भोकर गुरन 233/2023** कलम 5, 6, 7, 9, महाराष्ट्र प्राणि संरक्षण कायदा व कलम 5 (क), 9(अ) प्राण्यांना क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री उबाळे, मो. नं. 9823045224** हे करीत आहेत.

**3)किनवट :–**दिनांक 29.06.2023 रोजी चे 00.05 वा. चे सुमारास, **किनवट येथील समतानगर मस्जीद जवळ किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद छोटा हाता वाहन क्रमांक एमएच–26/ई–1529 किंमती 2,00,000/–रूपये वाहना मध्ये एक बैल जातीचे जनावर किंमती 25,000/–रूपयाचे असे एकुण 2,25,000/–रूपयाचा मुद्देमाल बैलाला बना परवाना बेकायदेशिररीत्या अपुऱ्या जागेत निर्दयतेने बांधुन कत्तल करण्या करीता वाहतुक करीत असतांना मिळुन आला. त्यास वाहनाचे खाली उतरून विचारपुस करीत असतांना अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/893, गजानन श्रावण डुकरे, ने. पोस्टे किनवट** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे किनवट गुरन 169/2023** कलम 5 (अ) 5 (ब), व 9, (3)11(ड)(ई)(फ) प्राण्यांना क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम व महाराष्ट्र प्राणि संरक्षण कायदा प्रमाणे तसेच केंद्रीय मोटार वाहन नियम 1989 च्या नियम 125(ई) गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1913 राठोड, मो. नं. 9767868500** हे करीत आहेत.

.

**3)इतवारा :–**दिनांक 28.06.2023 रोजी चे 22.10 वा. चे सुमारास, **हेमानगर गल्ली नं. 15 टिपु सुलतान रोड नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने त्यांचे ताब्यात एक पांढऱ्या रंगाचा बैल किंमती 45,000/–रूपयाचा अपुऱ्या जागेत निर्दयतेने बांधुन बिना परवाना बेकायदेशिररीत्या कत्तल करण्या करीता बांधुन ठेवलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/2117, धीरजकुमार गंगाधरराव कोमुलवार, ने. पोस्टे इतवारा** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा गुरन 193/2023** कलम 5, 9, महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1988 मानेकर, मो. नं. 02462–236510** हे करीत आहेत.

**4)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 29.06.2023 रोजी चे 21.20 वा. चे सुमारास, **वांगी फाटा ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने त्यांचे जागेत तीन बैल किंमती 60,000/–रूपयाचे बिना परवाना बेकादेशिररीत्या अशोक लिलॅड कंपणीचे पिकअप क्रमांक एमएच–26/बीई–6369 किंमती 75,000/–रूपयाचा मध्ये कत्तली करीता हयगय व निष्काळजीपणाणे वाहतुक करीत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/273, वसंत बालाजी केंद्रे, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 478/2023 कलम 5 (अ) 5 (ब), व 9, (3)11(ड)(ई)(फ) प्राण्यांना क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम व महाराष्ट्र प्राणि संरक्षण कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/616 चक्रधर, मो. नं. 7020448411** हे करीत आहेत.

## 3)भारतीय हत्यार कायदा :–

**शिवाजीनगर :–**दिनांक 26.06.2022 रोजी चे 20.00 वा. चे सुमारास, **जुने फायर स्टेशन समोरील सार्वजनिक रोडवरील चौकात नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक धारधार लोखंडी खंजर बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/मिलींद मधुकर सोनकांबळे, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 203/2023 कलम 34 भादवि सह कलम 4/25, भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/81 बंडेवार, मो.क्र. 9923103778** हे करीत आहेत.

## 4)जुगार :–

**धर्माबाद :–** दिनांक 28.06.2023 रोजी चे 23.30 वा. चे सुमारास, **जलील किराणा दुकानासमोर मोकळया जागेत मौ. रत्नाळी ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी व साहित्य असा एकुण 9700/–रूपयाचे मुद्देमालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/श्री मनोज वसंतराव मसलेकर, ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 149/2023 कलम 12 (अ) म.जु.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री कारामुंगे, मो.क्रं.** हे करीत आहेत.

## 5)प्रोव्हिबीशन :–

**1)शिवाजीनगर :–** दिनांक 29.06.2023 रोजी चे 13.30 वा. चे सुमारास, **गणेशनगर वाय पॉईंट समोरील सार्वजनिक रोडवर नांदेड** येथे, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 1890/–रूपयाची चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री मलींद मधुकर सोनकांबळे, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर गुरनं 200/2023** कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/182 ढवळे, मो.नं. 9823093182** हे करीत आहेत.

**2)धर्माबाद :–** दिनांक 29.06.2023 रोजी चे 18.30 वा. चे सुमारास, **आरोपीचे किराणा दुकानाचे बाजुस मोकळया जागेत मौ. आटाळा ता. धर्माबाद जि. नांदेड** येथे, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 1400/–रूपयाची चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री शिवप्रसाद माधवराव कत्ते, ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद गुरनं 154/2023** कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/222 मठपती, मो.नं. 8390589720** हे करीत आहेत.

**3)धर्माबाद :–** दिनांक 29.06.2023 रोजी चे 16.15 वा. चे सुमारास, **धर्माबाद ते कारेगाव जाणारे रोडवरील सायकल जवळील स्वागत धाबा यांचे पाठीमागील मोकळया जागेत ता. धर्माबाद जि. नांदेड** येथे, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 3220/–रूपयाची चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री शिवप्रसाद माधवराव कत्ते, ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद गुरनं 152/2023** कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/2247 मुंडे, मो.नं.** हे करीत आहेत.

**4)धर्माबाद :–** दिनांक 29.06.2023 रोजी चे 13.15 वा. चे सुमारास, **आरोपीचे किराणा दुकानाचे बाजुस मोकळया जागेत मौ. सालेगाव ता. धर्माबाद जि. नांदेड** येथे, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 2450/–रूपयाची चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/श्री सुदाम अमरू आडे, ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद गुरनं 151/2023** कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/2247 मुंडे, मो.नं.** हे करीत आहेत.

**5)धर्माबाद :–** दिनांक 29.06.2023 रोजी चे 11.30 वा. चे सुमारास, **आरोपीचे घराचे बाजुस टिनशेडमध्ये मौ. करखेली ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 3360/–रूपयाची चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/श्री सुदाम अमरू आडे, ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद गुरनं 150/2023** कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/2247 मुंडे, मो.नं.** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड